**निशाणी ७९ खाली**

**<u>मुळ प्रतिवादी क्र. २ व प्रतिदाव्यातील वादी क्र. २ याचे मुळ दावा व प्रति दाव्यात तील साक्षीदार क्र. ०२ रामेश्वर अवचितराव चव्हाणचा इ-प्रणाली द्वारे दाखल केलेल्या सरतपासावर उलट तपास शपथेवर मुळवादी तर्फे ॲड एन.बी. सोनवणे यांचे मार्फत सुरु</u>**

७. माझे शिक्षण इयत्ता दहावी पर्यंत झाले आहे. मी साक्ष माझ्यासाठी व माझ्या भाऊ व वडिलांतर्फे देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलाने व भावाने मला साक्ष देण्यासाठी लेखी अधिकारपत्र दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र. १ सुलोचनाबाई व वादी क्र. ४ माझ्याच गावातील आहे. माझी जन्म तारीख २/६/१९८२ आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९९ मध्ये मी १७ वर्षाचा होतो. मी माझा भाऊ संजय पेक्षा वयाने मोठा आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी सुलोचनाबाई हीच्या कुटूंबाबाबत मला माहिती आहे. हे मला सांगता येणार नाही की, सुलोचनाबाईचे पती वाळूबा चव्हाण हे १९९० मध्ये मयत झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, तिचे पती मयत झाले त्यावेळेस मला कळत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सुलोचनाबाईचे सासरे धोंडीबा सन २००७ मध्ये मयत झाले. हे म्हणणे खरे आहे की, तिचे सासरे मयत झाल्याने घरामध्ये सुलोचनाबाई , तिचा मुलगा जगदीश व तिची मुलगी होते. हे मला सांगता येणार नाही की, वादींकडे वडीलोपार्जित किती मिळकत होती. हे मला सांगता येणार नाही की, वादींनी त्यांची वडीलोपार्जित मिळकत विकली होती. मी वादमिळकतीचा ७/१२ उतारा बघीतला आहे.

८. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ४४० मध्ये माझे वडिल अवचितराव यांच्या नावे ४८ आर जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ४४० मध्ये विहिर आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, विहिर होती परंतु ती ढासळली आहे. हे म्हणणे खरे आहे की, विहिर ढासळ्याबाबत महसूल विभागामार्फत पंचनामा केलेला आहे. मी महसूल विभागामार्फत झालेल्या पंचनाम्याची प्रत दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे आहे की, त्या विहिरीची नोंद कमी करण्यासाठी मी किंवा माझ्या वडिलांनी कारवाई केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी देखील ती विहिर अस्तीत्वात आहे. हे म्हणणे खरे नाही की, विहिर अस्तीत्वात असल्याने आम्ही नोंद कमी करण्याची कारवाई केली नाही.

९. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडिल अवचितराव यांनी सुलोचनाबाई हीस २४ आर जमीन विहिरीचे पाणी घेण्याच्या हक्कासहीत दि. १२/५/१९९९ ला खरेदीने दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, फेर क्र. १३४९ अन्वये ७/१२ उता-यावर सुलोचनाबाईच्या नावाची नोंद झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, ७/१२ उता-यावर झालेली सुलोचनाबाईच्या नावाची नोंद आज देखील तशीच आहे.

१०. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ४४० मधील आमची वडीलोपार्जित मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी किंवा माझा भाऊ संजय याने माझ्या वडिलांनविरुध्द वाटणीचा किंवा सुलोचनाबाई हीला करुन दिलेल्या खरेदीखत रद्द मागणीचा दावा केला नाही. हे म्हणणे खरे

नाही की, आम्ही फेर क्र. १३४९ नोंदवताना विरोध केला नाही. आम्ही फेरला तोंडी आक्षेप घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की, फेर रद्द करण्यासाठी मी, माझे वडील किंवा भावाने अपील केले नाही.

११. मी नि.६७ वरील खरेदीखत नोंदवते वेळी दुय्यम निबंधक कार्यालयात हजर होतो. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखतावर माझी साक्षीदार म्हणून नाव नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी नि.६७ वरील खरेदीखत साक्षीदारांनी बळजबरीने नोंदवून घेतल्याबाबत पोलिस स्टेशनला लेखी तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, दुय्यम निबंधक कार्यालयात खरेदीखतासोबत गहानखताचे दस्त देखील नोंदवले जातात. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखतामध्ये गहानखताचा उल्लेख केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडिलांनी सुलोचनाबाई विरुध्द दि. ३१/८/२०१५ रोजी सहाय्यक निबंधक यांच्याकडे सावकारीबाबत तक्रार केली होती. हे म्हणणे खरे आहे की, दि.२३/३/२०१६ रोजी सहाय्यक निबंधक यांनी माझ्या वडिलांची तक्रार फेटाळली होती. मी वादमिळकतीमधील ७ गुंठे जमीन माझ्या ताब्यात असल्याचे कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

१२. हे म्हणणे खरे नाही की, वादी सुलोचनाबाई हिच्या घरी कोणीही मोठा सदस्य नसल्याने व तिची गरीबीची परिस्थिती असल्याने आम्ही तिची जमीन हडपण्याचा प्रयत्न करतो. हे म्हणणे खरे नाही की, सुलोचनाबाई सावकारकीचा व्यवसाय करते हा खोटा आरोप तिच्यावर करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादमिळकत सुलोचनाबाई हीला व्याजाने व गहानखताने दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी सुलोचनाबाई हिला व्याजासह रक्कम परत केल्याबाबत कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखत सुलोचनाबाईस कायमस्वरुपी रक्कम रु.३००००/- च्या बदल्यात करुन दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सुलोचनाबाई ही सन १९९९ पासून ते आजपावेतो वादमिळकतीची मालक व ताबेदार आहे. हे मला सांगता येणार नाही की, सुलोचनाबाईने माझ्या व माझ्या वडिलांविरुध्द दि.२४/२/२०१६ रोजी वादमिळकत हरकत अडथळा केल्याबाबत पोलिस स्टेशनला तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखत माझ्यावर व वडीलांवर बंधनकारक आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादमिळकत हडप करण्याकरीता वादी विरुध्द खोटा प्रतिदावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिदावा हा मुदतीत दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिदाव्यात अपूर्ण न्यायालयीन शुल्क भरले आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटे शपथपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष दिली.

**उलट तपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत समक्ष

sd/-

**(धनंजय एस.देवरे)**

**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, फुलंब्री**

**दि.१९.०१.२०२४.**